CIDCO
WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको
शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १ जुलै २०२१**

**"सर्वांसाठी घरे" या सिडकोच्या ध्येयाची वचनपूर्ती - श्री. एकनाथ शिंदे**

**"सिडको महामंडळातर्फे बांधण्यात आलेली ही घरे आजूबाजूच्या परिसरातील घरांच्या किंमतीशी तुलना करता अतिशय परवडणाऱ्या दरात उपलब्ध आहेत ही उल्लेखनीय बाब आहे. अतिशय उत्तम बांधकाम दर्जा असेलली ही घरे सर्वसामान्यांचा सिडकोवरील विश्वासास अधिक बळकटी देतात. या गृहनिर्माण योजनेस केंद्र सरकारकडून लागू असलेल्या अनुदानाचा भार सिडको महामंडळाने उचलला आहे. १ जुलैपासून घराचा ताबा देण्याचे वचन सिडकोने पाळले आहे. "** असे उद्गार **श्री. एकनाथ शिंदे,** मंत्री, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांनी काढले. सिडको महामंडळाच्या २०१८-१९ महागृहनिर्माण योजनेतील कळंबोली येथील गृहनिर्माण योजनेच्या साईट व्हिजीट प्रसंगी त्यांनी हे उद्गार काढले. या वेळी श्री. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते यशस्वी अर्जदारांना सदनिका सुपूर्द करण्यात आल्या.

या साईट व्हिजिटला **श्री. राजन विचारे,** खासदार, ठाणे, **डॉ. संजय मुखर्जी,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांची प्रमुख उपस्थिती तर **श्री. अश्विन मुद्गल,** सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, **श्री. कैलास शिंदे,** सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको उपस्थित होते.

या साईट व्हिजिट दरम्यान श्री. एकनाथ शिंदे यांनी हजारो कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होत आहे, ही आनंदाची बाब असून कोविड-१९ च्या काळातही सिडकोतील अभियंते व अधिकाऱ्यांनी घरांचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याकडे लक्ष पुरविले. केवळ घर बांधणी व विकास प्रकल्प यात मर्यादित न राहता सिडकोने कोविड काळाच्या संकट समयी शासनाच्या निर्देशानुसार विविध ठिकाणी कोविड सेंटर व रूग्णालयाची उभारणी केली हे कौतुकास्पद आहे असे प्रशंसोद्गार काढले.

या वेळी डॉ. संजय मुखर्जी यांनी **कोविड-१९ महासाथीच्या काळात उद्भवलेल्या अडचणींवर केलेली मात तसेच अर्जदारांना भेडसावणाऱ्या आर्थिक अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून अर्जदारांना दिलासा देणारे निर्णय घेतल्याचा उल्लेख केला. यशस्वी अर्जदारांना सदनिका सुपूर्द करण्याचा हा क्षण वचनपूर्तीचा आनंद देणारा आहे. आजपासून यशस्वी अर्जदारांना घरांचा ताबा टप्याटप्याने देण्यात येईल** असेही ते म्हणाले.

सिडकोतर्फे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये १४,८३८ घरांची योजना सुरू करण्यात आली. सदर योजने अंतर्गत नवी मुंबईतील घणसोली, खारघर, कळंबोली, तळोजा आणि द्रोणागिरी या ५ नोड्मध्ये ११ ठिकाणी घरे साकारण्यात आली. १४,८३८ घरांपैकी ५,२६२ घरे आर्थिक दृष्ट्या दुर्बल

घटकासाठी तर ९,५७६ घरे अल्प उत्पन्न गटासाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. ही घरे १ बीएचके (१ हॉल, १ खोली, १ स्वयंपाकघर, २ स्वच्छतागृहे) प्रकारातील असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी उपलब्ध असलेल्या घराचा चटई क्षेत्र २५.८१ चौ.मी. तर अल्प उत्पन्न गटाकरिता असलेल्या घराचा चटई क्षेत्र २९.८२ चौ.मी. इतका आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी तळोजा येथे २,८६२, खारघर येथे ६८४, कळंबोली येथे ३२४, घणसोली येथे ५२८ आणि द्रोणागिरी येथे ८६४ घरे उपलब्ध करून देण्यात आली होती. अल्प उत्पन्न गटासाठी तळोजा येथे ५,२३२, खारघर येथे १,२६०, कळंबोली येथे ५८२, घणसोली येथे ९५४ आणि द्रोणागिरी येथे १,५४८ घरे उपलब्ध करून देण्यात आली. या योजनेतील गृहसंकुलांना भारती शास्त्रीय संगीतातील रागांची नावे देण्याची अभिनव कल्पनाही राबविण्यात आली. सदर योजनेची संगणकीय सोडत दिनांक २ ऑक्टोबर २०१८ रोजी यशस्वीरीत्या पार पडली.

---

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**